Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# अदिवासी विकास आणि शासकिय उपाययोजना.

**प्रा.लटपटे एन. के.**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
कै.सौ.शेषाबाई सिताराम मुंढे कला महाविद्यालय,
गंगाखेड

**प्रस्ताविक : —**

भारतातील तीन प्रमुख समुदायापैकी एक समुदाय हा आदिवासी समुदाय आहे. देशातील सर्वच राज्यामध्ये कमी जास्त प्रमाणात आदिवासी समुदाय दिसुन येतो. भारतात जवळपास २५० आदिवासी जमाती व उपजमाती आहेत. तसेच भारतातील लोकसंख्येपैकी जवळपास ८ टक्के लोकसंख्या हि आदिवासी समुदायाची आहे. देशात १९४१ च्या जनगणने नुसार आदिवासी समुदायाची लोकसंख्या हि २.५ कोटी होती तिच लोकसंख्या २००१ च्या जनगणने नुसार ८.३५ कोटी झाली. २०११ च्या जनगणने नुसार भारतात १०.४२ कोटी झाली लोकसंख्या दिसुन येते.

आदिवासी समुदाय हा ग्रामीण व नागरी समुदायाच्या तुलनेत मागासलेला असुन तो विकासाच्या प्रवाहापासुन दुर आहे. आदिवासी समुदायाच्या विकासासाठी त्यांना प्रवाहात आणण्यासाठी शासनाव्दारे अनेक उपाय योजना करण्यात आलेल्या आहेत. आदिवासी समुदायासाठी अनेक योजना राबविण्यात येत आहेत. तसेच अनेक सवलती, अनुदान दिली जात आहेत जेणेकरुन या मागासलेल्या आदिवासी समुदाय विकासा पासुन वंचित राहु नये हाच प्रमुख उद्देश ठेवून विविध योजना राबविण्यात येत आहेत. आणि या योजनांना अपेक्षित यश मिळत नसले तरी त्या निश्चितच आदिवासी विकासासाठी महत्वपुर्ण ठरत आहेत.

**आदिवासी समुदायाची व्याख्या** : इंग्रजी मधील TRIBE या शब्दाचा अर्थ ‘जमात‘ असा होतो. आदीपासुन किंवा सुरवाती पासुन दऱ्याखोऱ्यात राहणारा किंवा जंगलात निवास करणारे म्हणजे आदिवासी होय.

भारतीय संविधानात आदिवासींना अनुसुचीत जमाती असे संबोधले आहे. भारतीय सविंधानातील कलम ३४२ (१) अनुसार ‘ज्यांचा समावेश अनुसूचीत जामातीच्या यादीत केला आहे त्यांना अनुसूचीत जमाती असे म्हणतात.

डॉ.रिव्हर्स यांनी 'जामात किंवा आदिवासी हा एक सरळ साधा सामाजिक समुह आहे. ज्यातले सदस्य एक समान बोलीभाषेचा वापर करतात व युध्द वगैरे सारख्या उद्देश पुर्तीसाठी एकत्रीत कार्य करतात.'

एका विशिष्ट भुप्रदेशात वास्तव्य करणारा आणि समान जिवन पध्दती असणारा तसेच तांत्रिक ज्ञानाच्या दृष्टीने मागसलेला समाज हा आदिवासी समाज आहे.

**आदिवासी विकासाच्या उपयोजना :—**

**१)संविधानात्मक तरतुदी :**

भारतीय संविधानातील कलम १५ नुसार आदिवासी समुदायाशी कोणत्याही प्रकारचा भेदभाव करता येणार नाही तसेच कोणतेही निर्बंध लावता येणार नाहीत अशी तरतुद करण्यात आली आहे.

सविंधानातील कलम १६ नुसार नोकरी किवा पदावार समान संधी देण्यात आली आहे. कलम ४६ नुसार आदिवासाना आर्थिक आणि शैक्षणिक विशेष सोयीसुविधा देण्यात आल्या आहेत. कलम १६४ नुसार स्वात्रंत आदिवासी विभागाची स्थापना करण्यात आली आहे. कलम ३३० व ३३२ नुसार आदिवासींना लोकसभा व विधानसभेत स्वातंत्र आरक्षण देण्यात आलेले आहे. कलम ३३५ नुसार सरकारी नोकरी साठी वयोमर्यादित सुट देण्यात आली आहे तसेच सरकारी नोकऱ्या मध्ये ७.५ टक्के अरक्षण ठेवण्याची तरतुद आहे.

**२)शासकिय नोकऱ्यात अरक्षण :**

आदिवासी समुदाय राष्ट्रीय प्रवाहात यावा त्यांना आर्थिक व सामाजिक विकास व्हावा या हेतुने सविंधानातील कलम ३३५ नुसार केंद्र व राज्य सरकार तसेच खाजगी शासकिय अनुदानावर चालणाऱ्या संस्थेत आदिवासी समुदायासाठी ७.५ टक्के अरक्षणाची तरतुद करण्यात आली आहे तसेच त्यांना अनुषेश भरुन काढण्याचे धोरण आहे. आदिवासी समुदायासाठी नोकरी लागण्यासाठी वयाची वयोमर्यादा देखील वाढवण्यात आली आहे. तसेच किमान गुणवत्ता, सेवानुभव व पदोन्नती यासाठी विशेष सवलती देण्यात आलेल्या आहेत.

**३)शैक्षणिक सवलती :**

आदिवासी समुदाय हा दुर्गम भागत वात्यव्य करत आल्याने तसेच आर्थिक दृष्टया मासल असल्यामुळे या समुदायात शैक्षिणीक मागासलेपणा मोठ्या प्रमाणात देसुन येतो. आदिवासी समुदायात शिक्षणाचा प्रसार करण्याच्या दृष्टीकोणातुन शासनाने आनेक उपाय योजना केल्या आहेत. त्यात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, शासकिय वस्तीगृह, पुस्तके व जेवणासाठी खर्च यांची तरतुद करण्यात आली आहे. तसेच अनेक ठिकाणी स्पार्धा परिक्षा

केंद्राची स्थापाना करण्यात आली असुन उच्च शिक्षणासाठी अरक्षणाची देखील तरतुद करण्यात आलेली आहे.

**४)राजकिय आरक्षण :**

आदिवासी समुदायाला सत्तेत प्रतीनिधीत्व मिळावे ह्या हेतुने लोकसभा विधानसभा तसेच पंचायतराज मध्ये आरक्षण देण्यात आले आहे. आदिवासी लोकांना योग्य प्रतिनिधीत्व मिळत असल्याने आदिवासी लोक आपले प्रश्न, समस्या व विकासात्मक मुद्दे शासन दरबारी मांडत आहेत.

**५)आर्थिक विकास :**

आदिवासी विकासासाठी त्यांची आर्थिक प्रगती आवश्यक आहे. त्यासाठी शासनाने विशेष लक्ष दिले आहे. बहुतांश आदिवासी लोकांचा व्यवयास शेती असल्यामुळे त्यांच्या आज्ञानाचा फायदा ईतर लोकांनी घेउ नये म्हणुन शेती जमीनीचे हस्तांतरण टाळण्याचा कायदा केला आहे. आदिवासी विकासाठी आदिवासी विकास महामंडळाची स्थापाना करण्यात आली आहे. तसेच कुटीर उद्योगासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज पुरवठा व अनुदान देउन आर्थिक विकासाला चालना दिली आहे.

**६)आरोग्य विषयक सुविधा :**

आदिवासी लोकांच्या आरोग्य विषय अनेक समस्या आहेत अपुरा आणि निकृष्ट आहार, कुपोषन ईत्यादी बाबी लक्षात घेउन आदिवासी कल्याण कार्याक्रमांतर्गत त्यांना आरोग्य विषयी सुविधा पुरविल्या जातात आदिवासी समुदायात मोठ्या प्रमाणात दवाखाने व फिरते दवाखाने निमार्ण करण्यात आले आहेत. तसेच आदिवासींना मोफत औषधे दिली जातात शासणाचा आदिवासी भागत आरोग्य केद्र, बालसंगोपण केंद्र प्रस्तुतीगृहे चालु करण्यावर विशेष दिला आहे.

**७)पंचवार्षिक योजना :**

पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातुन आदिवासी विकासासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत आदिवासी विकासासाठी निधीची तरतुद करण्यात आली असुन हा निधी केवळ आदिवासी कल्यासाठीच खर्च केला जातो. विहीरी बांधने, बि—बियाणे, खते ईत्यादी साठी मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य केले जाते.

**८)पायाभुत सुविधा :**

आदिवासी समुदायात पायाभुत सुविधा निर्माण करण्यात शासन प्राधान्य देत आहे. प्रत्येक आदिवासी पाडा हा रस्त्यांनी जोडला जात आहे. रस्ते विकाससोबतच पाणी, लाईट,

शाळा, दवाखाने ईत्यादीची सुविधा पुरविण्यास शासन प्रयत्नशिल आहे.

**९)जिवनमान उंचविणे :**

आदिवासी लोकांचे जिवनमान उंचविण्यासाठी शासन उपाययोजना करत असुन शेती, हस्तकला, उद्योगासाठी प्रशिक्षण देणे तसेच आर्थिक मदत करणे यावर शासणाचा विशेष भर आहे.

**१०)पंतप्रधान अवास योजना :**

आदिवासी लोकांची घरे हि कच्ची असतात त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते पंतप्रधान अवाय योजनेच्या माध्यमातुन आदिवासी लोकांना निवाऱ्यासाठी पक्की घरे दिली आहेत.

**११)जलजिवन मिशन :**

जलजिवन मिशनच्या माध्यमातुन प्रत्येक आदिवासी पाड्या पर्यंत शुध्द पिण्याचे पाणी पुरविले जात आहे.

**निष्कर्ष :**

आदिवासी समुदाय हा भारतातील प्रमुख समुदाय आहे. आदिवासी लोक दुर्गम भागात वास्तव्य करत आसल्यामुळे या समुदायात अज्ञान, निरक्षरता, आर्थिक मागासलेपणा, आरोग्याच्या समस्या मोठ्या प्रमाणात दिसुन येतात. देशाला स्वातंत्र मिळाल्या नंतर खऱ्या अर्थाने आदिवासी विकासाकडे लक्ष देण्यात आले. प्रत्येक पंचवार्षीक योजनेच्या माध्यमातुन आर्थिक तरतुद करण्यात आली. आजही हा समुदाय अनेक समस्यांनी ग्रस्त असला तरी त्यांच्या सर्वांगीन विकासासाठी त्यांना सविंधानीक अधिकार, पायाभुत सुविधा, शिक्षण, आरोग्य, निवारा, पाणी पुरवठा, आर्थिक मदत शासनाने केलेले दिसुन येते.

**संदर्भ ग्रंथ :**

१)सामाजिक संशोधन पध्दती :— डॉ.प्रदीप आगलावे
२)आदिवासी समाजाचे समाजशास्त्र :— डॉ.प्रदीप आगलावे
३)समाजशास्त्र :— प्रो.एल.एल.गुप्ता आणि डॉ.डि.डि.शर्मा
४)भारतीय अर्थ व्यवस्था :— गौरव दत्त, आश्विनी महाजन
५)आदिवासी विकास आणि वास्तव्य :— गारे गोविंद